# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

## (ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)

फोन नं.: (०२३५८) २८२३८७ ई-मेल: dpl.amfu@gmail.com

**अंक ०७/२०२१** **दिनांक २२/०१/२०२१** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/०१/२०२१ ते २२/०१/२०२१) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/०१/२०२१ सकाळी ८:३० पासून २७/०१/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: हवामान वेधशाळा, ठाणे) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **१६/०१** | **१७/०१** | **१८/०१** | **१९/०१** | **२०/०१** | **२१/०१** | **२२/०१** | | **२३/०१** | **२४/०१** | **२५/०१** | **२६/०१** | **२७/०१** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | ३३.६ | - | ३३.४ | ३३.० | ३३.८ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३२ | ३१ | ३१ | ३१ |
| २०.० | १९.० | २०.० | १९.० | २१.२ | २०.२ | - | **किमान तापमान (अं.से)** | १९ | १८ | १८ | १७ | १७ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ |
| ६२ | ६७ | ७३ | ६४ | ६० | ६२ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ४७ | ४७ | ४५ | ४३ | ४३ |
| - | ६५ | - | ४४ | ४६ | ५० | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | २५ | २४ | २३ | २१ | १८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ६ | ५ | ६ | ६ | ६ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | पू. | ई.पू. | पू. | ई.पू. |

### हवामान सारांश /ईशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार ठाणे जिल्ह्यात दिनांक २३ ते २७ जानेवारी, २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहून कमाल आणि किमान तापमानात घट संभवते तसेच दिनांक २६ ते २७ जानेवारी, २०२१ दरम्यान आकाश ढगाळ राहील. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | - | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस उष्णतेसाठी कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत तसेच थंडीपासून संरक्षणाकरिता भिंतीच्या जाळ्यांना गोणपाटाचे पडदे लावावेत. |
| **आंबा** | मोहोर अवस्था | • **बोंगे फुटण्याच्या अवस्थेत** असलेल्या आंब्यावर **तुडतुड्यांचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• **मोहोर फुटलेल्या** आंबा बागेमध्ये मोहोरावर **तुडतुडे, मिजमाशी इ.किडींचा तसेच भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **मोहोर फुलण्यापूर्वी** तुडतुडे आणि मिजमाशीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. (**टीप:** मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून सकाळी ९.०० ते १२.०० किंवा सायंकाळी ३.०० वाजल्यानंतर फवारणी करावी.) |

| | | |
|---|---|---|
| | | • या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• शिफारशीत दिलेली कीटकनाशकाची/बुरशीनाशकाची मात्रा ही मनुष्यबळाने वापरण्यात येणाऱ्या पंपासाठी आहे. |
| **काजू** | मोहोर ते फळधारणा | • **मोहोर अवस्थेत** असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींच्या वाढीसाठी हवामान अनुकूल दिसत असल्याने या किडींच्या बंदोबस्तासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच **फळधारणा** झालेल्या काजूच्या फळांवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• **टीप:** ढेकण्या किड सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेस सक्रीय असल्याने किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर करावी. या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• काजू बियांचे उत्पादन व बियांचे आकारमान वाढविण्यासाठी प्रति झाड ताज्या किंवा आठ दिवसापर्यंत साठविलेल्या २५ टक्के गोमुत्राच्या ५ लिटर द्रावणाची फवारणी आणि २५ टक्के गोमुत्राच्या १० लिटर द्रावणाची झाडाच्या बुंध्यामध्ये जिरवणी पालवी आल्यापासुन एका महिन्याच्या अंतराने अशा एकूण चार फवारणी कराव्यात. |
| **नारळ** | फळधारणा | • नारळावर रुगोज चक्राकार पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून या किडीची पिल्ले आणि प्रौढ पानांच्या खालील बाजूस राहून रस शोषण करतात आणि पानांवर रुगोज चक्राकार पांढरी माशीचे मेणचट तंतू दिसून येतात. तसेच माशी पानांवर गोड चिकट स्त्राव सोडत असल्याने त्यावर वातावरणातील काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. या किडीच्या व्यवस्थापनासाठी माडावर ५० मि.ली. कडूलिंब तेल (०.५ टक्के प्रवाही) प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या प्रेशर पंपाने कराव्यात.तसेच पानांवर वाढलेल्या काळ्या बुरशीच्या नियंत्रणासाठी स्टार्चच्या १ टक्के तीव्रतेच्या (१० ग्रॅम किंवा १० मि.ली. प्रति लिटर पाणी) द्रावणाची फवारणी करावी. |
| **वाल** | फुलोरा ते शेंगा अवस्था | • वाल पिकामध्ये शेंगा पोखरणारी अळी व घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीचा प्रादुर्भाव सुरुवातीला कोवळ्या कळ्यावर दिसून येतो व नंतर शेंगामध्ये शिरून कोवळ्या दाण्यांवर उपजीविका करते. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व ५ टक्के निबोळी अर्क किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. तसेच शेतामध्ये पक्षी थांबे उभारावे.<br>• वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सवेंदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या व दाणे भरण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **वांगी** | फुलोरा ते फळधारणा | • वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंडे व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाउसाचा अंदाज घेवून फवारणी करावी.<br>• वांगी पिकास नत्र खताची तिसरी मात्रा ४ ग्रॅम युरिया प्रती रोप पुर्नलागवडीनंतर दोन महिन्यांनी देण्यात यावी. |
| **मिरची** | फुलोरा ते | • मिरची पिकाला फळधारणेच्या वेळी नत्र खताची तिसरी मात्रा ३ ग्रॅम युरिया प्रती रोप या |

| | | |
|---|---|---|
| | फळधारणा | प्रमाणे खताची मात्रा देण्यात यावी. |
| **कुकुटपालन** | - | • किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस उष्णतेसाठी कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब लावावेत तसेच थंडीपासून संरक्षणाकरिता भिंतीच्या जाळ्यांना गोणपाटाचे पडदे लावावेत. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.